सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ३१ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंतप्रधान मोदी नागपुरात, हेडगेवारांना वाहिली आदरांजली

नागपूर : हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा. चैत्र महिन्यातील पहिल्या दिवशी गुढी पाडवा हा सण साजरा करतात. चैत्र महिन्यापासून मराठी नववर्षाला सुरूवात होते. या नववर्षाचा उत्साह राज्यभरात पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपूरच्या दौऱ्यावर आले आहेत. मोदींनी नागपूरमध्ये आल्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या स्मृतिस्थळाला भेट दिली आणि त्यांना आदरांजली वाहिली. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला भेट दिली. सरसंघचालक मोहन भागवत यांच्याशी चर्चा केली.



याआधी नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान मोदींचे स्वागत केले. विमानतळावर उतरल्यावर पंतप्रधान मोदींनी नागपूरमध्ये असलेल्या दीक्षाभूमीला भेट दिली. दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या दीक्षाभूमीवर जाऊन पंतप्रधान मोदींनी गौतम बुद्धांना वंदन केले आणि प्रार्थना केली.

नंतर संघ मुख्यालयात जाऊन पंतप्रधान मोदींनी स्मृती मंदिराला भेट दिली आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्थापकांना आदरांजली वाहिली. डॉ. हेडगेवार आणि संघाचे दुसरे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी या दोघांची स्मारके नागपूरच्या रेशीमबाग परिसरातील डॉ. हेडगेवार स्मृती मंदिरात आहेत. स्मृती मंदिरात आदरांजली वाहून पंतप्रधान मोदींनी तिथल्या अभ्यागत पुस्तिकेत संदेश लिहून स्वाक्षरी केली.

डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्य आधारस्तंभ आणि भारतीय जनता पार्टीचे वैचारिक पालक असल्याचे पंतप्रधान मोदींनी अभ्यागत पुस्तिकेत नमूद केले. अभ्यागत पुस्तिकेत पुढे मोदींनी डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी हे संघाच्या स्वयंसेवकांसाठी उर्जेचा स्रोत असल्याचेही नमूद केले.

गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ २०१४ मध्ये स्थापन झालेल्या माधव नेत्रालय आय इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटरच्या नवीन विस्तारित इमारतीची अर्थात माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरची पायाभरणी पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाली. नव्या सुविधेत २५० खाटांचे रुग्णालय, १४ ओपीएस आणि १४ मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर असतील. परवडणाऱ्या दरात सामान्यांना वैद्यकीय सेवा दिल्या जातील.

पंतप्रधान मोदी सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडच्या दारुगोळा निर्मिती प्रकल्पालाही भेट देतील. ते यूएव्ही चाचणीसाठी १२५० मीटर लांब आणि २५ मीटर रुंद असलेल्या नव्याने बांधलेल्या हवाई पट्टीचे उद्घाटन करतील. तसेच आधुनिक शस्त्र निर्मिती प्रकल्पाचेही उद्घाटन करतील.

## नेपाळमध्ये राजेशाहीच्या मागणीसाठी हिंसक आंदोलन, आंदोलकांची धरपकड

काठमांडू : नेपाळमध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये सरकारी निर्देशांनुसार लोकशाही दिन साजरा करण्यात आला. यानंतर नेपाळमध्ये राजेशाहीच्या मागणीसाठी हिंसक आंदोलन झाले. मागील काही दिवसांपासून नेपाळमध्ये वेगवेगळ्या वर्गांमध्ये राजेशाहीची मागणी जोर धरू लागली आहे. मागणी करणाऱ्यांची संख्या वाढली आणि नेपाळमध्ये सरकार विरोधात हिंसक आंदोलन झाले. नेपाळ सरकारने हिंसक आंदोलकांना आळा घालण्यासाठी लष्कराची मदत घेतली आहे. काठमांडूत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. आंदोलकांची धरपकड सुरू आहे. तर आंदोलकांनी नेपाळ सरकारला ३ एप्रिल पर्यंत राजेशाही आणा नाहीतर परिणाम भोगा, असा इशारा दिला आहे.

हिंसक आंदोलनात सार्वजनिक संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हेच कारण पुढे करुन नेपाळ सरकार पदच्युत राजे ज्ञानेंद्र शाह यांच्या विरोधात कारवाई करण्याची तयारी करत आहे. पदच्युत राजे ज्ञानेंद्र शाह यांनीच फूस लावल्यामुळे हिंसक आंदोलन सुरू असल्याचा आरोप नेपाळ सरकारने केला आहे. दंगलीतील सार्वजनिक संपत्तीच्या हानीची भरपाई म्हणून नेपाळ सरकारने पदच्युत राजे ज्ञानेंद्र शाह यांना सात लाख ९३ हजार नेपाळी रुपये एवढा दंड भरण्याचे निर्देश दिले आहेत.



दंड भरण्यासाठी पदच्युत राजे ज्ञानेंद्र शाह यांना नेपाळ सरकारने नोटीस बजावली आहे. पैसे विहित मुदतीत सरकारकडे जमा केले नाही तर पदच्युत राजे ज्ञानेंद्र शाह यांचा पासपोर्ट जप्त करुन रद्द केला जाईल; असे संकेत नेपाळ सरकारने दिले आहेत.

नेपाळमध्ये २००८ मध्ये २४० वर्षांची हिंदू राजाची राजवट संपुष्टात आली. राजेशाही संपल्यापासून नेपाळमध्ये लोकशाही व्यवस्था राबवण्यास सुरुवात झाली आहे. राजाची राजवट संपल्यापासून नेपाळमधील भ्रष्टाचारात वाढ झाली आहे. नेपाळमधील बेरोजगारांचा प्रश्न अधिकाधिक गंभीर होऊ लागला आहे. तरुण पिढीत सत्ताधाऱ्यांविषयीची नाराजी वाढत आहे. या नाराजीतूनच नेपाळमध्ये राजेशाहीची मागणी जोर धरू लागली आहे.

## राज्यभरात गुढीपाडव्याचा उत्साह, अनेक ठिकाणी शोभायात्रा

मुंबई: हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा. चैत्र महिन्यातील पहिला दिवस हा गुढीपाडव्याचा सण साजरा केला जातो. या दिवशी घरोघरी गुढी उभारून नववर्षाचे स्वागत केले जाते.चैत्र महिन्यापासून मराठी नववर्षाला सुरूवात होते. या नववर्षाचा उत्साह राज्यभरात पाहायला मिळत आहे. शिशिर ऋतूतील पानगळ संपलेली असते, सरत्या वर्षाला निरोप द्यायचा आणि उगवत्या वर्षाचे स्वागत करायचं. मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात मराठी नवीन वर्षाचं स्वागत केलं जातं.




यावर्षी राज्यभरात अनेक ठिकाणी नववर्षाच्या स्वागतासाठी भव्य स्वागतयात्रा काढल्या जातात. या शोभायात्रांमध्ये तर तरूणाईचा उत्साह ओसंडून वाहत असतो. ढोल-ताशांच्या गजरात, भव्य मिरवणूक काढून नववर्षाचे उत्साहाने स्वागत केले जाते. यावेळी सगळेचजण पारंपारिक वेशभूषा करतात. डोंबिवली, गिरगाव, पुणे तसेच अनेक ठिकाणी ही शोभायात्रा मोठ्या उत्साहात काढली जाते.

गुढीपाडव्याचा मुहूर्त म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी मोठी खरेदीही केली जाते. सोने-चांदी खरेदीलाही ग्राहकांची मोठी गर्दी असते. नववर्षाच्या मुहूर्तावर सोने, चांदी, इलेक्ट्रॉनिक वस्तू वाहन व घर घेण्याकडे देखील नागरिकांचा कल दिसून येतो.

## आयपीएस सुधाकर पठारे यांचे भीषण अपघातात निधन

नागरकुरलून : तेलंगणातील श्रीशैलम येथून नागरकुरलूनकडे जात असताना आयपीएस सुधाकर पठारे यांचे अपघाती निधन झालं आहे. देवदर्शनासाठी गेले असता पठारे यांच्या कारचा अपघात झाला आणि त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात परभणी येथील कंत्राटदार भागवत खोडके यांचाही मृत्यू झाला आहे. हे दोघे ज्या गाडीतून प्रवास करत होते त्या गाडीची ट्रकसोबत धडक झाली



आणि हा अपघात झाला. सुधाकर पठारे हे २०११ बॅचचे आयपीएस



अधिकारी असून पठारे यांच्या निधनाने महाराष्ट्र पोलिस दलावर शोककळा पसरली आहे.

आयपीएस सुधाकर पठारे यांच्यावर सध्या मुंबई पोलिसात पोर्ट झोनचे डीसीपी म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली होती. पठारे हे काही काळापूर्वी ट्रेनिंगसाठी हैदराबादमध्ये गेले होते. तिथं त्यांच्या एका नातेवाईकासह ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असताना हा अपघात झाला. अपघातात सुधाकर पठारे यांच्यासोबत त्यांचे नातेवाईक असलेल्या भागवत खोडके यांचाही मृत्यू झाला.

सुधाकर पठार हे स्पर्धा परीक्षा देत असताना १९९५ साली जिल्हा विशेष लेखा परीक्षक झाले. यानंतर १९९६ मध्ये विक्रीकर अधिकारी वर्ग म्हणून त्यांची निवड झाली. तसंच नंतर १९९८ साली पोलिस उपअधीक्षक म्हणून त्यांची निवड झाल्यानंतर पोलिस खात्यातच ते रमले. आतापर्यंत त्यांनी पोलिस उपअधीक्षक म्हणून पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर, राजुरा येथे काम केले आहे.

## मणिपूर, नागालँड आणि अरुणाचलमध्ये AFSPA आणखी सहा महिने वाढवला



नवी दिल्ली : केंद्र सरकारने मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या ईशान्य भारतातील तीन राज्यांसाठी सशस्त्र दल विशेष अधिकार कायद्याचा कालावधी आणखी सहा महिने वाढवला. यामुळे मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये आणखी काही काळ सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा, १९५८ (२८ वा मुद्दा) च्या कलम ३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर केला जाणार आहे. यासाठीची अधिसूचना जारी झाली आहे.

केंद्र सरकारने मणिपूरमधील कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेतला. यानंतर मणिपूरमधील पाच जिल्ह्यांतील इम्फाळ, लामफेल, सिटी, सिंगजामेई, पतसोई, वांगोई, पोरोमपत, हिंगांग, इरिलबुंग, थौबल, बिष्णुपूर, नंबोल आणि काकचिंग पोलिस ठाण्याच्या हद्दीत सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा लागू नसेल असे जाहीर केले. उर्वरित मणिपूरमध्ये सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा लागू असेल. तसेच नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांतही सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा लागू असेल.कायद्यामुळे केंद्राच्या मान्यतेशिवाय अशांत भागात काम करणाऱ्या सशस्त्र दलांना व्यापक अधिकार आणि खटल्यापासून मुक्तता मिळेल. फुटीरतावादी अतिरेक्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या ईशान्य भारतातील तीन राज्यांमध्ये सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा लागू आहे. या कायद्यामुळे सुरक्षा पथकांना विशेषाधिकार मिळाले आहेत. या अधिकारांमुळे ते वॉरंटशिवाय अटक करू शकतात तसेच विशिष्ट परिस्थितीत गोळीबार करू शकतात. मणिपूर आणि नागालँडमध्ये १९५८ पासून तर अरुणाचल प्रदेशमध्ये १९७२ पासून सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा लागू आहे.

## कन्नडची तिफण पोहचली आता राष्ट्रीय पातळीवर

### 'तिफण'कार डॉ. शिवाजी हुसे यांच्या धडपडीला यश

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

२००९ मध्ये बलिप्रतिपदेला बळिराजाला वंदन करून त्रैमासिक तिफणचा श्रीगणेशा कन्नडसारख्या ग्रामीण दुर्गम व डोंगराळ भागातून झाला. कुठल्याही प्रकारचे सहाय्य नसताना अतिशय मेहनतीने 'तिफण' ची वाटचाल झाली. डॉ. हुसे हे शेतकरी कुटूंबातून आलेले मराठीचे प्राध्यापक आहेत. तिफण हे कृषकांचे प्रतिक घेवून डॉ. हुसेंनी मराठवाड्याच्या सुपिक मातीत अक्षर पेरणी केली आहे. मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश आदी भागात 'तिफण'ने आपला लेखक वाचकवर्ग निर्माण केला आहे. या वाटचालीत अनेक उपक्रम राबविले. आज तिफण विविध माध्यमातून समाज मनाची मशागत करीत आहे.

'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे यत्न करू' या न्यायाने तिफण प्रसिद्ध होत आहे. तिफण लेखक-वाचक जोडो अभियान, तिफण लेखक-वाचक मेळावा, पुस्तक प्रकाशने, काव्यलेखन कार्यशाळा, कविसंमेलने, कविकट्टा, पुस्तक प्रदर्शन, तिफण कविता महोत्सव, तिफण पुरस्कार, तिफण साहित्य सन्मान पुरस्कार, तिफण राज्य काव्य पुरस्कार, तिफण



वाङ्मयीन पुरस्कार, तिफण राष्ट्रीय चर्चासत्रे, तिफण संवाद अशा किती तरी उपक्रमांतून 'तिफण' ने मायमराठीची सेवा केली आहे. २५ पेक्षा अधिक नावीन्य पूर्ण विषयावर विशेषांक प्रसिद्ध करून मोलाची भर घातली. सर्वच विशेषांक दखल पात्र ठरले. नदी विशेषांक, ऊसतोड कामगार विशेषांक, झाडीपट्टी रंगभूमी विशेषांक, बोली भाषा विशेषांक,, मराठवाड्यातील साहित्य विशेषांक, भाषा, साहित्य संस्कृती विशेषांक, आदिवासी विशेषांक, छ. शिवाजी महाराज विशेषांक, यशवंतराव चव्हाण विशेषांक, मूर्ती , कला व स्थापत्य विशेषांक, लोककला विशेषांक, लोक साहित्य विशेषांक, कविता विशेषांक आणि आता कथा विशेषांक वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. 'तिफण' हे आता लिहित्या हाताचे व्यासपीठ झाले आहे. तिफण केवळ एक मासिक नसून, ती एक वाङ्मयीन चळवळ झाली आहे. तिफणने अनेकांना संपादक मंडळावर घेतले. आता राज्यासह देशभरातील अभ्यासक, लेखक, वाचक तिफणशी जोडले गेले आहे. मॉरिशस, कर्नाटक, गोवा, हैद्राबाद, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, अशा देशाच्या विविध भागात तिफणने आपला लेखक वाचक वर्ग निर्माण केला आहे. तिफणची ही अक्षर पेरणी आता भारतभर होत आहे. कन्नडची तिफण आता देशपातळीवर पोहोचली आहे. या वाटचालीत अनेकांचे सहकार्य, पाठबळ व मार्गदर्शन असल्याचे तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे सांगितले.


तिफण प्रकाशन, तिफण वाचक चळवळ, तिफण डिजिटल, तिफण फेसबुक पेज, तिफण वेब पोर्टल, तिफण बोली व भाषा संशोधन प्रशिक्षण केंद्र, सानेगुरुजी अनुवाद केंद्र, तिफण बाल साहित्य सभा, संत भगवान बाबा अध्यासन केंद्र, तिफण सखी मंच अशी आता तिफणची केंद्रे झाली आहेत. भविष्यात तिफणला मोठे काम उभे करायचे असा डॉ. हुसे यांचा मनोदय आहे. मूलभूत काम तिफणच्या माध्यमातून होत आहे. कन्नडचे नाव 'तिफण' ने आता राष्ट्रीय पातळीवर नेले आहे. हा कन्नड तालुक्याचा, डॉ. शिवाजी हुसे ज्या महाविद्यालयात प्राध्यापक आहे त्या शिवाजी महाविद्यालयाचा आणि तमाम शेतकरी मायबापांच्या मुलांचा सन्मान आहे. उद्या कदाचित हीच कन्नडच्या भूमितील तिफण सातासमुद्र पार करून आंतरराष्ट्रीय पातळीवरही पोहचेल. तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे आणि त्यांना पाठबळ देणारे सर्व मार्गदर्शक, लेखक - वाचक यांच्या सामुहिक प्रयत्नाचे हे यश आहे. तिफण ची आता वेबसाईट तयार होत असून नवबदलासह, नव्या सहकाऱ्यासह देशभर अक्षरपेरणी करण्यास आता कन्नडची ही तिफण सज्ज झाली आहे. समस्त भूमिजनांची ही तिफण आहे.

## बंगळुरू - कामाख्या एक्सप्रेस घसरली, रुळावरुन ११ डबे उतरले

नवी दिल्ली : ओडिशातील कटक जिल्ह्यात बंगळुरू - कामाख्या एसी सुपरफास्ट एक्सप्रेसचे ११ डबे रुळावरुन खाली घसरले. या अपघातात एकाचा मृत्यू झाला आणि सात जण जखमी झाले. मदतकार्य सुरू आहे. अपघातानंतर रेल्वे प्रशासनाने हेल्पलाईन क्रमांक जाहीर केले आहेत.

जखमींवर एससीबी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. मृतदेहाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. खुर्दा रोड विभागांतर्गत कटक - नारगुंडी रेल्वे विभागातील नारगुंडी स्थानकाजवळ रविवार ३० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजून ५४ मिनिटांनी अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाने पूर्व विभागातील रेल्वे वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्याचे काम हाती घेतले आहे. तंत्रज्ञांच्या मदतीने रुळ दुरुस्त करुन रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

हेल्पलाईन क्रमांक : ८४५५८८५९९९ आणि ८९९११२४२३८




## हेलिकॉप्टर अपघातातून राज्यपाल हरिभाऊ बागडे थोडक्यात बचावले

जयपूर : राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्रातील भाजपचे नेते हरिभाऊ बागडे यांच्या हेलिकॉप्टरला शनिवारी(दि.३०)अपघात झाला. मात्र अपघातामध्ये ते थोडक्यात बचावले आहे. राजस्थानमधील पाली येथून हरिभाऊ बागडे यांचं हेलिकॉप्टर उड्डाण करत असताना ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ आता व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये अचानक स्फोट झाला. ही घटना शनिवारी (दि. ३०) सायंकाळच्या सुमरास घडली.हरिभाऊ बागडे हे राजस्थानवरून पाली येथील एका कार्यक्रमासाठी आले होते. हा कार्यक्रम झाल्यानंतर ते जयपूरला निघाले होते त्याचवेळी ही घटना घडली.पाली येथून हेलिकॉप्टरने उड्डान घेत असताना हेलिकॉप्टरच्या मागच्या भागात स्फोट झाला. स्फोट होताच धूर निघू लागला. स्फोट झाल्याचे लक्षात घेता पायलटने तात्काळ हेलिकॉप्टरचे सुरक्षित लँडिंग केले. त्यामुळे



सुदैवाने या अपघातामध्ये पायलटसह हरिभाऊ बागडे थोडक्यात बचावले.

या अपघाताचा व्हिडीओ आता समोर आला असून तो व्हायरल होत आहे. या घटनेमुळे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या सुरक्षेतील मोठी चूक आढळून आल्याचे सांगितले जात आहे. राज्यपाल बागडेंची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आपत्कालीन प्रोटोकॉल लागू केला जाऊ शकतो. सध्या या अपघाताची चर्चा होत आहे.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंदू नववर्षानिमित्त स्वामी नरेंद्राचार्य जिल्हा समितीच्यावतीने भव्य शोभायात्रा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

जगद्गुरु रामानंदचार्य, श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्या प्रेरणेने हिंगोली जिल्हा सेवा समितीच्यावतीने गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नववर्षाच्या निमित्ताने हिंगोली शहरातील देवडा नगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली.

हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी तसेच सर्व हिंदू एकत्रीत बांधण्यासाठी स्वामी नरेंद्र महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने जिल्हा समितीच्यावतीने रविवारी भव्य शोीायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा नांदेड नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोस्ट ऑफिस रोड, जवाहार रोड, गांधी चौक, इंदिरा चौक, नांदेड नाका, या मार्गाने पुन्हा विठ्ठल रुक्मिणी मंदिर या ठिकाणी महाप्रसादाने समारोप करण्यात आला.

या मिरवणुकीमध्ये महिलांनी आपल्या हातात गुढी तसेच डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन रखरखत्या उन्हात या



शोभायात्रेमध्ये सहभाग घेतला. अनेक महिला-पुरूषांनी भगवे ध्वज हाती घेतले होते. तसेच या शोभायात्रेत लहान बालकांनी टाळ मृदंगाच्या गजरात हरिनामाचा गजर करून परिसरात नव चैतन्यमय, आनंदमय वातावरण निर्माण केले होते. शोभायात्रेत छत्रपती शिवाजी महाराज व झाशीची राणी यांचा देखावाही करण्यात आला होता. स्वामी नरेंद्रचार्य महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली होती. विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे सांगता आरती करण्यात आली. त्यानंतर आलेल्या महिला, पुरुष भक्तांना महाप्रसादाची वाटप करण्यात आले.

नववर्षानिमित्त काढण्यात आलेल्या शोभा यात्रा यशस्वी करण्यासाठी सर्व गुरुबंधू, गुरुभगिनी यांनी तन-मन-धनाने सहकार्य केले त्यांचे आभार जिल्हा सेवा समिती हिंगोली च्या वतीने मानण्यात आले.

# गुढी व्यसनमुक्तीची, हमी व्यसनमुक्त जीवनाची

## सर्वोदय मंडळाचा स्तुत्य उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

मराठी नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त येथील समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, व्यसनमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या शुभदा सरोदे, व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल यांनी व्यसनमुक्तीच्या प्रदर्शनाद्वारे व्यसनमुक्तीचा संदेश दिला.

केंद्र शासन पुरस्कृत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत नशामुक्त भारत अभियान समिती, व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार करणारे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वसमत येथील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात व्यसनमुक्त गुढीपाडवा उपक्रम पार पडला. यावेळी नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्ष शुभदा सरोदे सामाजिक कार्यकर्त्या शोभा देशमुख, अश्विनी मिरासे, किरण भोकरे, अश्विनी सूर्यवंशी, जान्हवी भोकरे आदींची उपस्थिती होती. नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी विशाल अग्रवाल म्हणाले, नवीन वर्षाच्या अनुषंगाने गुढीपाडव्याच्या निमित्त नवीन संकल्प घेऊन वर्षभर व्यसनमुक्त राहण्याचा संकल्प करण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी शुभदा सरोदे यांनी व्यसनमुक्तीची गरज असून समाजामध्ये महिलांना व्यसनमुक्ती उपक्रमाची गरज आहे. व्यसनांमध्ये अडकलेल्या व्यसनींना बाहेर काढण्याचे आव्हान आहे. यावेळी गुढीपाडव्यानिमित्त तरुणांनी व्यसनमुक्तीचा कास धरावी असे प्रतिपादन शुभदा सरोदे यांनी केले. व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल यांनी व्यसनांच्या दुष्परिणामबाबत पत्रकांचे वितरण केले.

# हिंगोलीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्ष प्रतिपदा उत्सव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

गुढीपाडवा आणि नव हिंदू वर्षानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोली शहर चा वर्ष प्रतिपदा उत्सव रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र शुक्ल प्रतिपदा ला सायंकाळी ५.३० मिनिटानी शहरातील तापडिया इस्टेट वसाहतीतील महावीर उद्यान येथे साजरा करण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्सवपैकी वर्ष प्रतिपदा चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुडी पाडवा) हा हिंदू नववर्षाचा पहिला उत्सव या दिवशी हा उत्सव मोठ्या प्रमाणात संपूर्ण हिंगोली जिल्यात साजरा केल्या जातो. या दिवशी संघाचे आद्य सर संघचालक माननीय श्री डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांना आद्य सर संघचालक प्रणाम ही दिल्या जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील दायित्ववान स्वयंसेवक यांना नवीन वर्षात नवीन दायित्व दिल्या जाते. आणि स्वयंसेवक हे दायित्व प्रामाणिकपणे निभाविन्याचे संकल्प करतो. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गजानन पोपलाईत यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्ते उपेंद्र कौडगांवकर यांचे बौद्धिक झाले. या कार्यक्रमास स्वयंसेवक, लोकप्रतिनिधी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- जिल्हा परिषदेच्या नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश यांचे शासकीय विश्रामगृहात आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, अभियंता गीते आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# न्यू मॉडेल डिग्री कॉलेजच्या स्नेह संमेलनाचा थाटात समारोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड द्वारा संचलित न्यू मॉडेल डिग्री कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा थाटात समारोप झाला.

या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. सोळंके होते. तर वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. पृथ्वीराज तौर (मराठी विभाग प्रमुख तथा संचालक, ललित व परोपजीवी कला संकुल स्वा.रा.ती.म.वि.नांदेड), नामदेवराव मस्के, डॉ. पी. बी. निरपळ, डॉ. अतिश कदम व डॉ. सचिन काळबांडे व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करुन समारोपीय कार्यक्रमास सुरुवात झाली. मा. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. पी. बी. निरपळ यांनी समारोपीय अहवाल सादर केला. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. पृथ्वीराज तौर (मराठी विभाग प्रमुख तथा ललित व परोपजीवी कला संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड) यांचा परिचय डॉ. सचिन काळबांडे यांनी करून दिला. वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. पृथ्वीराज तौर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मान्यवरांच्या हस्ते सांस्कृतिक व क्रीडा प्रकारातील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतिश कदम यांनी केले तर आभार डॉ. के. एल. पुरी यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ जीवंत ठेवणाऱ्या कलावंतांना न्याय देणार- आ. तान्हाजी मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागाळात पेरण्याचे व रुजविण्याचे काम खऱ्या अर्थाने कलावंत मंडळी करीत आहेत ,बाबासाहेबांची चळवळ जिवंत ठेवणाऱ्या लोक कलावंतांना न्याय दिला जाईल असे प्रतिपादन आमदार तानाजी मुटकुळे यांनी केले.



हिंगोली तालुक्यातील पिंपळखुटा येथे दि.२७ मार्च गुरुवार रोजी महाराष्ट्रातील लोक कलावंतांच्या मेळाव्याचे आयोजन बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचचे संस्थापक कवि,गायक दत्ता शिंदे यांनी केले होते. मेळाव्यात महाराष्ट्रातील कवी, गायक कडूबाई खरात, शालिनी शिंदे,दत्ता शिंदे, सुषमा देवी,उमा भारतीं यांनी हजेरी लावून गिते गायली.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आ.तानाजी मुटकुळे हे होते, या प्रसंगी आ.मटकुळे पुढे बोलताना म्हणाले की, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर लोक कलावंतांची मानधन समिती लवकरच गठीत केली जाणार आहे, समीतीत व मानधनासाठी बोगस लोकांना टाळून खऱ्या लोक कलावंतांची निवड करण्यात येईल असी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.प्रास्ताविक भाषणात दत्ता शिंदे यांनी सांगितले की, बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर कलावंतांचे जाळे पसरले असून विविध जाती धर्माचे कलावंत त्यामध्ये सहभागी आहेत कलावंताच्या न्याय व हक्कासाठी आमचीही संघटना महाराष्ट्रभर मेळावे घेत असून हिंगोली जिल्ह्यात पिंपळखुटा या दुर्गम भागात हा पहिला मेळावा आयोजित केला असून त्याला विदर्भ व मराठवाड्यातून मोठ्या संख्येने लोक कलावंत व रसिकांनी हजेरी लावली.आम्ही कलाकार मंडळी नेहमीच कोणत्याही फळाची अशा न ठेवता आमच्या गीताच्या माध्यमातून जनजागृती चे काम करीत असतो परंतु सरकारच्या माध्यमातून आम्हाला मान-धन मिळाल्यास निश्चितच नव्या जोमाने काम करता येईल. या मेळाव्यात सकाळच्या सत्रात मराठवाडा व विदर्भातून आलेले लोक कलावंतांनी आपले गीत गायले त्यानंतर सायंकाळच्या सत्रास सुरूवात झाली या वेळी महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका कडूबाई खरात यांच्यासह शालिनी शिंदे,दत्ता शिंदे, सुषमा देवी,उमा भारतीं यांनी प्रत्येकी दोन गिते गायली उपस्थित प्रेक्षकांनी त्यांना उत्स्फूर्त दाद दिली.

मेळाव्या त महाराष्ट्रातून आलेल्या कलावंत मंडळींना नियुक्तीपत्रे दत्ता शिंदे व शालिनी शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश इंगोले व सिध्दार्थ गरपाळ यांनी केले आभार कवी गायक दिलीप साठे यांनी मानले,कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश मानवतकर,शेषराव नाईकवाड,दिलीप बनकर, सूर्यकांत रायबोले,गोविंद भारशंकर व पिंपळखुटा ग्रामस्थांनी व महिला मंडळाने परीश्रम घेतले.या वेळी मोठ्या संख्येने राजकीय पुढारी तसेच प्रेक्षक मंडळींनी हजेरी लावली होती.

# हिंगोलीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञानिमित्त भव्य कलश-शोभा यात्रेला उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**







श्री त्रिशूल नवदूर्गा महोत्सव समिती, हिंगोली आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात रविवारी पाडव्याला सकाळी कलश यात्रा संकट मोचन हनुमान मंदीर येथून निघाली. या कलश- शोभा यात्रेला उदंड प्रतिसाद मिळाला.

भल्या पहाटे रस्त्यावर मोठ मोठ्या सुंदर रांगोळी रेखाटण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे मार्गावरील घरा समोरही रांगोळी काढून नागरिकांनी यात्रेचे जल्लोषात सहकुटुंब उपस्थित राहून स्वागत केले. शिवशंभो महिला ढोल पथक, संत नामदेव संस्थान नरसी नामदेव येथील बाल वारकरी, लेझीम पथक, बॅन्ड पथक, राम, लक्ष्मण, सिता व हनुमान यांचा देखावा, रथ, हजारो कलशधारी महिला, बालक, तरुण, तरूणी, नागरीक मोठ्या भक्ती भावाने सहभागी झाल्या होत्या. ही कलश आणि शोभा यात्रा म. गांधी पुतळा, कपडा गल्ली, मारवाड गल्ली, जुने



ग्रामीण पोलिस ठाणे, टाले हॉल, माहेश्वरी भवन, श्रीराम कथा स्थळ येथे पोहचली. कलश यात्रेवर सहभागी भाविकांवर मार्गावरून जात असताना फुलांचा वर्षाव करण्यात आला. ठिकठिकाणी पाणी, शरबत, आइस्क्रीम, चॉकलेट, फुळे, मठ्ठा यांचे स्टॉल भाविकांच्या सोई करीता उभारण्यात आले होते. तब्बल दोन तास कलश यात्रा सुरू होती. यावेळेस भाविकांनी जय श्रीराम चा जयघोष केला. भक्ती व श्रव्देत जय श्रीराम घोष करीत कलश यात्रेला उदंड प्रतिसाद मिळाला. यशस्वी करीता श्री. त्रिशूल नवर्दुगा महोत्सव समिती पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

महामंडलेश्वर श्री. श्री. १००८ प. पू मा. कनकेश्वरीदेवी यांच्या वाणीतून ही श्री राम कथा ज्ञान यज्ञाची वाणी ऐकावयास मिळणार आहे. दुपारी चार ते वेळेत दररोज श्री राम कथा ज्ञानयज्ञ होणार आहे. कथेनंतर दररोज महाप्रसादाचे आयोजन देखील केले जाणार असल्याची माहिती आयोजक यांनी दिली आहे. ज्ञान यज्ञासाठी संरक्षक समिती म्हणून खासदार नागेश पाटील आष्टीकर, हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजी मुटकुळे , कळमनुरीचे आमदार संतोष बांगर, वसमतचे आमदार राजू भैया नवघरे, आ. प्रज्ञाताई सातव, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बि. डी. बांगर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रमोद उर्फ बंडू कुटे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनायकराव भिसे, मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली यांचे योगदान लाभणार आहे.